मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# ...या प्रकरणामुळे महापालिका आयुक्तांना नोटीस

## पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून 15 दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश; दोषींवर कारवाईची मागणी




**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील सफाई कर्मचाऱ्यांकडून आवश्यक सुरक्षा उपकरणांशिवाय नाल्यांच्या साफसफाईची कामे करून घेतली जात असल्याच्या गंभीर तक्रारीची राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने दखल घेतली असून महापालिका आयुक्तांना नोटीस बजावली आहे.

आयोगाने आयुक्तांना नोटीस प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत संबंधित प्रकरणातील वस्तुस्थिती व करण्यात आलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, निर्धारित मुदतीत उत्तर प्राप्त न झाल्यास भारतीय संविधानाच्या कलम ३३८ अंतर्गत आयोगास प्रदान करण्यात आलेल्या दिवाणी न्यायालयाच्या अधिकारांचा वापर करून संबंधित अधिकाऱ्यांना वैयक्तिक किंवा प्रतिनिधीद्वारे आयोगासमोर हजर राहण्यास समन्स बजावण्यात येऊ शकते, असा इशाराही नोटीसमध्ये देण्यात आला आहे.

प्राप्त तक्रारीनुसार, आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नाल्यांच्या साफसफाईची कामे महापालिकेमार्फत करण्यात येत आहेत. या कामांसाठी यांत्रिक साधनांचा वापर करणे बंधनकारक असतानाही उपलब्ध यंत्रसामग्रीचा पुरेसा वापर न करता मानवी श्रमाचा वापर करण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच, सफाई कर्मचाऱ्यांना आवश्यक सुरक्षा उपकरणे उपलब्ध करून न देता धोकादायक परिस्थितीत काम करण्यास भाग पाडले जात असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकारामुळे "हाताने मैला साफसफाई करणाऱ्यांच्या नियोजनास प्रतिबंध व त्यांचे पुनर्वसन अधिनियम, २०१३", "नागरी हक्क संरक्षण अधिनियम, १९५५" तसेच "अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९" मधील संबंधित तरतुदींचे उल्लंघन होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. सफाई कर्मचाऱ्यांच्या मानवी प्रतिष्ठेला धक्का पोहोचविणाऱ्या व त्यांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्या अशा कृत्यांबाबत संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून कायदेशीर कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे.

यासंदर्भात दिनांक ५ मे २०२६ व १० जून २०२६ रोजी समाजमाध्यमांद्वारे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांकडून अद्याप प्रभावी कार्यवाही झालेली नसल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले आहे.

या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषी अधिकारी व संबंधित कंत्राटदारांविरुद्ध नियमानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जिल्हा दक्षता समितीचे सदस्य ॲड. सागर चरण यांनी केली आहे.

---

# महानगरपालिकेने खेळाडूंना दुखापत विमा संरक्षण द्यावे..!

## अरुण पाडुळे यांची मागणी, क्रीडा स्पर्धांदरम्यान होणाऱ्या दुखापतींचा आर्थिक भार कमी करण्यासाठी विमा संरक्षणाची गरज



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-महानगरपालिकेच्या वतीने वर्षभर विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. या स्पर्धांमध्ये हजारो खेळाडू उत्साहाने सहभागी होत असतात. मात्र, खेळादरम्यान अनेकदा खेळाडूंना गंभीर दुखापतींना सामोरे जावे लागते. अशा वेळी उपचारांचा आर्थिक भार खेळाडू व त्यांच्या कुटुंबीयांवर पडतो. ही बाब लक्षात घेऊन महानगरपालिका प्रशासनाने सर्व सहभागी खेळाडूंना दुखापत विमा संरक्षण द्यावे, अशी मागणी भाजपा क्रीडा शहराध्यक्ष अरुण पाडुळे यांनी केली आहे.

ही मागणी त्यांनी क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीचे सभापती कैलास कुटे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. यावेळी विरोधी पक्षनेतेभाऊसाहेब भोईर, माजी क्रीडा समिती सभापती व नगरसेवक प्रा. उत्तम केंदळे, नगरसेवक निलेश नेवाळे, शाम जगताप, सामाजिक कार्यकर्ते सचिन सानप आदी मान्यवर उपस्थित होते.

या मागणीमुळे खेळाडूंमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होईल, युवक क्रीडा क्षेत्राकडे अधिक आकर्षित होतील आणि शहरातील क्रीडा संस्कृतीला चालना मिळेल, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. दरम्यान, सभापती कैलास कुटे यांनी या मागणीवर सकारात्मक भूमिका घेत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे.

> **खेळाडू स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरीसाठी जीवाची पर्वा न करता खेळतात. मात्र, दुखापत झाल्यास तातडीच्या उपचारांसाठी आवश्यक आर्थिक व वैद्यकीय मदत उपलब्ध नसते. त्यामुळे स्पर्धेच्या नोंदणी प्रक्रियेसोबतच सर्व खेळाडूंना विमा संरक्षण देण्यात यावे. तसेच, गंभीर दुखापतीच्या प्रसंगी तातडीने उपचार मिळावेत यासाठी प्रत्येक स्पर्धास्थळी वैद्यकीय पथक व रुग्णवाहिकेची व्यवस्था सक्तीची करावी.**
>
> **- अरुण पाडुळे, क्रीडा शहराध्यक्ष, भाजपा**

> **"क्रीडा स्पर्धा म्हणजे केवळ स्पर्धा नसून शहराच्या आरोग्यदायी आणि सशक्त भविष्यासाठीची गुंतवणूक आहे. मात्र, खेळादरम्यान होणाऱ्या दुखापतींसाठी योग्य वैद्यकीय सुविधा आणि विमा संरक्षण उपलब्ध नसेल, तर अनेक होतकरू खेळाडू मागे हटू शकतात. त्यामुळे महानगरपालिकेने प्रत्येक स्पर्धेसाठी विमा संरक्षण, वैद्यकीय पथक आणि रुग्णवाहिकेची सक्तीची व्यवस्था करावी.**
>
> **- निलेश नेवाळे, नगरसेवक**

# पंतप्रधान मोदींच्या यशस्वी तपपूर्ती निमित्त जनकल्याण शिबीर!

## आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार, विविध योजनांचा लाभ एकाच छताखाली

**पिंपरी | प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली केंद्र सरकारने राबवलेल्या विविध जनकल्याणकारी योजनांच्या यशस्वी १२ वर्षांच्या प्रवासानिमित्त भोसरी, पिंपरी-चिंचवड येथे आमदार महेश लांडगे यांच्या वतीने नागरिकांसाठी भव्य जनकल्याण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

सोमवार, दि. १५ जून २०२६ ते बुधवार, दि. १७ जून २०२६ या कालावधीत सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत हे शिबिर आमदार महेश लांडगे मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालय, शितलबाग, पुणे-नाशिक रोड, भोसरी येथे पार पडणार आहे. या शिबिरामध्ये केंद्र व राज्य शासनाच्या विविध महत्वाकांक्षी योजनांची सविस्तर माहिती, नोंदणी तसेच थेट लाभ मिळवण्याची सुवर्णसंधी नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे.




या जनकल्याण शिबिरात ई-श्रम कार्ड नोंदणी, आयुष्मान भारत (PM-JAY) आरोग्य कार्ड, ABHA आरोग्य खाते, प्रधानमंत्री मानधन योजना, सुकन्या समृद्धी योजना, आयुष्मान भारत कुटुंब कार्ड आदी योजनांचा लाभ मिळणार आहे. या जनकल्याण शिबिराचा लाभ घेण्यासाठी सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### महिलांसाठी विशेष पिंक ई-रिक्षा योजना

» महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी विशेष पिंक ई-रिक्षा योजना राबवली जाणार असून या योजनेत केवळ ₹5,000 डाउन पेमेंट, तीन दिवसांत थेट डिलिव्हरी, दरमहा ₹30,000 पेक्षा अधिक उत्पन्नाची संधी, मोफत प्रशिक्षण, चार्जिंग लायसन्स व विमा सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. विशेष म्हणजे या योजनेसाठी वाहन परवान्याची आवश्यकता नाही.

“केंद्र व राज्य शासनाच्या प्रत्येक जनकल्याणकारी योजनेचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे, हे माझे कर्तव्य आहे. पिंपरी-चिंचवड शहरासह संपूर्ण पीएमआर परिसराचा सर्वांगीण विकास, महिलांचे सक्षमीकरण, युवकांसाठी रोजगाराच्या संधी आणि सर्वसामान्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्यासाठी मोदी सरकार काम करीत आहे. ‘विश्वास, विकास आणि जनकल्याण’ या मूल्यांवर चालत प्रत्येक नागरिकापर्यंत विकासाभिमुख हिंदुत्वाचा संदेश देण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत.”

- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे..

# पिंपळे गुरवमध्ये लाच घेताना महापालिकेचा बीट निरीक्षक एसीबीच्या जाळ्यात

## अनधिकृत बांधकामावर कारवाई टाळण्यासाठी मागितली लाच; पिंपळे गुरवमध्ये रंगेहात कारवाई



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपळे गुरव परिसरात अनधिकृत बांधकामावर कारवाई न करण्यासाठी ७० हजार रुपयांची लाच स्वीकारताना पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या ड क्षेत्रीय कार्यालयातील बीट निरीक्षक उमेश लोंढे याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात पकडले. या कारवाईमुळे महापालिका वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका नागरिकाने एसीबीकडे तक्रार दाखल केली होती. संबंधित तक्रारदाराच्या अनधिकृत बांधकामावर कारवाई न करण्यासाठी उमेश लोंढे याने ७० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचा आरोप करण्यात आला होता. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर एसीबीच्या पथकाने पिंपळे गुरव परिसरात सापळा रचला. ठरल्याप्रमाणे लाचेची रक्कम स्वीकारताना उमेश लोंढे याला एसीबीच्या अधिकाऱ्यांनी रंगेहात ताब्यात घेतले. गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या धडक कारवाईमुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेतील भ्रष्टाचाराचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला असून, महापालिकेच्या विविध विभागांतील कामकाजावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. एसीबीकडून पुढील तपास सुरू असून, या प्रकरणात आणखी काही बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, सार्वजनिक कामांसाठी अथवा प्रशासकीय प्रक्रियेसाठी कोणताही शासकीय कर्मचारी लाचेची मागणी करत असल्यास नागरिकांनी तत्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# भुशी धरण परिसरात सुरक्षा प्रश्न ऐरणीवर

## रेल्वे प्रशासनावर तातडीने उपाययोजनेची मागणी



**पिंपरी | प्रतिनिधी**

लोणावळा शहरातील पावसाळी पर्यटनाचे मुख्य केंद्र असलेल्या भुशी धरण परिसरात पर्यटकांची सुरक्षितता आणि स्थानिकांचा रोजगार असे दुहेरी प्रश्न गंभीर झाले आहेत. धरणाचा परिसर रेल्वे प्रशासनाच्या मालकीचा असून, मागील काही काळापासून येथील पायऱ्यांची दुरवस्था झाली आहे.

दुसरीकडे, रेल्वे प्रशासनाने केलेल्या अतिक्रमण कारवाईमुळे स्थानिक व्यावसायिकांच्या हातातील रोजगारही हिरावला गेला आहे. या दोन्ही मुद्द्यांकडे रेल्वे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन योग्य तोडगा काढावा, अशी मागणी लोणावळा नगर परिषदेचे नगराध्यक्ष राजेंद्र सोनवणे यांनी केली आहे.

भुशी धरण परिसरातील पायऱ्यांवर बसून पावसाळी पर्यटनाचा आनंद घेणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठी असते. मात्र, पाण्याच्या प्रचंड प्रवाहामुळे पायऱ्यांवरील दगड निखळून वाहून गेल्याने, सध्या हा परिसर पर्यटकांसाठी अत्यंत धोकादायक बनला आहे. कोणतीही मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी रेल्वे प्रशासनाने तातडीने या पायऱ्यांची डागडुजी करावी, अशी आग्रही मागणी सोनवणे यांनी केली आहे.

# आता पालिकेत एन्ट्रीसाठी पाळावे लागणार कडक नियम

## बॉम्ब धमकीच्या पार्श्वभूमीवर पुणे महापालिकेतील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर; अभ्यागतांसाठी सर्वंकष नियमावली बनवण्याचे स्थायी समितीचे आदेश.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिका बॉम्बने उडवून देण्याची धमकी आल्यानंतर पालिकेत भेटीसाठी येणाऱ्यांना आता नियमावलीचे पालन करावे लागणार आहे. नियामावली दहा दिवसांत स्थायी समितीसमोर मांडण्यात येणार असल्याची माहिती स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली. बॉम्ब धमकीमुळे पालिकेतील सुरक्षेचा विषय ऐरणीवर आला आहे. पहिल्या झटक्यातच २०० सुरक्षा रक्षकांच्या ओळखपत्राचा विषय चर्चेचा झाला.

सुरक्षा रक्षकच गळ्यात नुसती दोरी अडकवून फसवणूक करत असल्याचे लक्षात आले. सुरक्षा यंत्रणाच फसवी असेल तर येणाऱ्या नागरिकांच्या तपासणीचे काय हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. पालिकेत येण्या-जाण्यासाठी अनेक प्रवेशद्वार आहेत. या प्रवेशद्वारातून येण्या-जाण्याच्या मार्गावर सुरक्षा रक्षक नेमले आहेत. हे सुरक्षा रक्षक प्रत्येकाच्या बॅगेची तपासणी करतात.



### सुरक्षा रक्षकांच्या ओळखपत्रांचा मुद्दा चर्चेत

» बॉम्ब धमकीनंतर सुरक्षेच्या पहिल्याच तपासणीत काही सुरक्षा रक्षकांकडे वैध ओळखपत्र नसल्याचे निदर्शनास आले. काही रक्षक केवळ गळ्यात दोरी अडकवून कर्तव्य बजावत असल्याचा प्रकार समोर आल्याने सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांची तपासणी करणारी यंत्रणाच त्रुटीपूर्ण असल्यास सुरक्षेची खात्री कशी मिळणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. यामुळे सुरक्षा रक्षकांच्या पडताळणीसह संपूर्ण व्यवस्थेचा आढावा घेतला जाणार आहे.

महापालिकेतील सुरक्षाव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी सर्वंकष नियमावली तयार करण्याचे आदेश प्रशासनाला देण्यात आले आहेत. स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांच्या माहितीनुसार, ही नियमावली पुढील दहा दिवसांत स्थायी समितीसमोर मंजुरीसाठी मांडली जाणार आहे. यामध्ये व्हिजिटर पास, भेटीची वेळ निश्चित करणे, प्रवेशद्वारांवरील तपासणी प्रक्रिया आणि सुरक्षा रक्षकांच्या जबाबदाऱ्यांसह विविध बाबींचा समावेश असेल. यामुळे महापालिकेच्या सुरक्षेला अधिक बळकटी मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

त्याही पुढे जाऊन आता, ती व्यक्ती कोणत्या कामासाठी, कोणत्या विभागात, कोणाला भेटायला आला आहे, याची माहिती घेऊन नागरिकाला व्हिजीटर पास देण्यात येणार आहे. तसेच भेटण्याची वेळही ठरवली जाणार आहे. अशा अभ्यागत नियमांचा समावेश करून एक सर्वंकष नियमावली बनवण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत.

### व्हिजिटर पास'शिवाय प्रवेश नाही

» महापालिकेला बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्यानंतर सुरक्षा व्यवस्थेत मोठे बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापुढे महापालिकेत भेटीसाठी येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला व्हिजिटर पास घेणे बंधनकारक राहणार आहे. संबंधित व्यक्ती कोणत्या कामासाठी आली आहे, कोणत्या विभागात जाणार आहे आणि कोणाला भेटणार आहे, याची संपूर्ण माहिती नोंदविण्यात येणार आहे. यामुळे महापालिकेतील ये-जा अधिक नियंत्रित आणि सुरक्षित होणार असल्याचा प्रशासनाचा दावा आहे.

### दहा दिवसांत नवी सुरक्षा नियमावली

» महापालिकेतील सुरक्षाव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी सर्वंकष नियमावली तयार करण्याचे आदेश प्रशासनाला देण्यात आले आहेत. स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांच्या माहितीनुसार, ही नियमावली पुढील दहा दिवसांत स्थायी समितीसमोर मंजुरीसाठी मांडली जाणार आहे. यामध्ये व्हिजिटर पास, भेटीची वेळ निश्चित करणे, प्रवेशद्वारांवरील तपासणी प्रक्रिया आणि सुरक्षा रक्षकांच्या जबाबदाऱ्यांसह विविध बाबींचा समावेश असेल. यामुळे महापालिकेच्या सुरक्षेला अधिक बळकटी मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# पुणे शहरात 15 ते 24 जून दरम्यान जड-अवजड वाहनांच्या प्रवेशास बंदी

## वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश; अत्यावश्यक सेवांच्या वाहनांना दिलासा

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरातील वाहतूक कोंडीतून नागरिकांना दिलासा देण्याच्या दृष्टीने जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी मोटार वाहन कायदा, १९८८ मधील कलम ११५ अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत जड, अवजड व मल्टी ॲक्सल वाहनांच्या प्रवेशावर तात्पुरती बंदी घालण्याचे आदेश जारी केले आहेत.




या आदेशानुसार दि. १५ जून २०२६ रोजी रात्री १२ वाजेपासून ते दि. २४ जून २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत पुणे शहरातून इतर शहरांकडे जाणाऱ्या जड-अवजड वाहनांना शहरात प्रवेश करता येणार नाही. संबंधित वाहनांसाठी सोलापूर, मुंबई, अहिल्यानगर, सासवड, चाकण, शिक्रापूर, तळेगाव, जेजुरी, सुपे आदी मार्गांद्वारे पर्यायी मार्ग निश्चित करण्यात आले आहेत.

शहरात माल उतरविणे अथवा माल भरून इतरत्र जाणे आवश्यक असलेल्या तसेच अत्यावश्यक सेवा पुरविणाऱ्या वाहनांनी वाहतूक शाखा, पुणे शहर यांची ७२ तास अगोदर परवानगी घेऊन रात्री ११ ते सकाळी ६ वाजेदरम्यान निर्धारित पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे निर्देश देण्यात आले आहेत.

दरम्यान, पेट्रोल, डिझेल, दूध, शेतीमाल आदी अत्यावश्यक सेवा पुरविणाऱ्या वाहनांना या बंदी आदेशातून वगळण्यात आले आहे. नागरिकांनी व वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करून वाहतूक व्यवस्थेस सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी केले आहे.

बंदीमुळे प्रभावित होणाऱ्या वाहनांसाठी प्रशासनाने सोलापूर, मुंबई, अहिल्यानगर, सासवड, चाकण, शिक्रापूर, तळेगाव, जेजुरी आणि सुपे मार्गांद्वारे पर्यायी मार्ग निश्चित केले आहेत. वाहनचालकांनी या मार्गांचा वापर करून वाहतूक सुरळीत ठेवण्यास सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. यामुळे शहरातील मुख्य रस्त्यांवरील ताण कमी होण्याची अपेक्षा आहे.

### १५ ते २४ जूनदरम्यान विशेष निर्बंध

» पुणे शहरातील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेऊन जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी जड, अवजड आणि मल्टी ॲक्सल वाहनांच्या प्रवेशावर तात्पुरती बंदी घालण्याचे आदेश जारी केले आहेत. १५ जून २०२६ रोजी मध्यरात्रीपासून २४ जून २०२६ रोजी मध्यरात्रीपर्यंत ही बंदी लागू राहणार आहे. या कालावधीत पुणे शहरातून इतर शहरांकडे जाणाऱ्या जड वाहनांना शहराच्या हद्दीत प्रवेश करता येणार नाही.

# ग्रँड टूर स्पर्धेसाठी समन्वयाने काम करा! उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या सूचना

## पुणे ग्रँड टूरच्या दुसऱ्या पर्वासाठी सज्ज व्हा; आंतरराष्ट्रीय दर्जाचा नवा मापदंड उभारण्याचे आवाहन

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे ग्रँड टूर सायकल स्पर्धेच्या यशस्वी आयोजनातून आपण एक आंतरराष्ट्रीय दर्जाचा उपक्रम उभा करण्याचे आव्हान अत्यंत कमी कालावधीत साध्य केले. आता दुसऱ्या पर्वाच्या आयोजनाच्या माध्यमातून या स्पर्धेची उंची, दर्जा, व्याप्ती आणि प्रभाव अजून पुढे न्यायचा असून, नवा मापदंड निर्माण करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित पुणे ग्रँड टूर सायकल स्पर्धेच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. या वेळी जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे, विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले, पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम, पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी,

क्रीडा व युवक सेवा आयुक्त दीपक सिंगला, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, सीएफआयचे महासचिव मनिंदर पाल सिंह (दूरदृष्य प्रणालीद्वारे) आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या, की अगदी शहरापासून ग्रामीण भागापर्यंत पुणे ग्रँड टूरचा आनंद सर्वांनी घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पाठबळाने ही स्पर्धा यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आली.

पुणे ग्रँड टूर सायकल स्पर्धेच्या पहिल्या पर्वाला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हा उपक्रम आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचला आहे. अत्यंत कमी कालावधीत यशस्वी आयोजन करून पुण्याने क्रीडा क्षेत्रात नवा आदर्श निर्माण केला. आता दुसऱ्या पर्वाच्या माध्यमातून स्पर्धेचा दर्जा आणि व्याप्ती आणखी वाढवण्याचे उद्दिष्ट प्रशासनासमोर आहे, असे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सांगितले.

या ग्रँड टूरची संकल्पना, त्यामागील दूरदृष्टी आणि उपक्रम प्रत्यक्षात आणण्याचा पाया तत्कालीन उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांनी रचला. पुणे जागतिक दर्जाच्या क्रीडा स्पर्धांचे केंद्र बनावे, महाराष्ट्रातील युवकांना सायकलिंगसारख्या उत्कृष्ट क्रीडा प्रकारांसाठी व्यासपीठ मिळावे, ही त्यांची दूरदृष्टी होती. आगामी स्पर्धेमुळेही आपल्या ऐतिहासिक वास्तू, ऐतिहासिक स्थळे जगाच्या पटलावर येऊन पर्यटनाला आणखी चालना मिळेल, असा विश्वासही पवार यांनी व्यक्त केला.



### पुण्याला जागतिक क्रीडा नकाशावर स्थान

**» पुणे ग्रँड टूरची संकल्पना आणि त्यामागील दूरदृष्टी तत्कालीन उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांनी मांडली होती. पुणे हे जागतिक दर्जाच्या क्रीडा स्पर्धांचे केंद्र बनावे आणि राज्यातील युवकांना सायकलिंगसारख्या क्रीडा प्रकारांसाठी मोठे व्यासपीठ मिळावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे पवार यांनी नमूद केले.**

### पहिल्या पर्वाच्या यशाची दखल

**» पुणे ग्रँड टूर सायकल स्पर्धेच्या पहिल्या पर्वाला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हा उपक्रम आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचला आहे. अत्यंत कमी कालावधीत यशस्वी आयोजन करून पुण्याने क्रीडा क्षेत्रात नवा आदर्श निर्माण केला. आता दुसऱ्या पर्वाच्या माध्यमातून स्पर्धेचा दर्जा आणि व्याप्ती आणखी वाढवण्याचे उद्दिष्ट प्रशासनासमोर आहे, असे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सांगितले.**

### पर्यटनालाही मिळणार चालना

**» आगामी पुणे ग्रँड टूर स्पर्धेमुळे पुणे जिल्ह्यातील ऐतिहासिक वास्तू, सांस्कृतिक वारसा आणि पर्यटनस्थळे जागतिक पटलावर झळकतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. शहरासह ग्रामीण भागातही या स्पर्धेचा सकारात्मक प्रभाव जाणवला असून, क्रीडा आणि पर्यटन विकासाचा संगम साधणारा हा उपक्रम ठरणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले..**

# पुणे जिल्ह्यातील एक लाख शेतकरी होणार कर्जमुक्त

## दोन लाखांपेक्षा जास्त थकीत कर्ज असणाऱ्या 21 हजार शेतकऱ्यांना उर्वरित रक्कम भरल्यानंतरच मिळणार कर्जमाफीचा फायदा

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य सरकारने जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने'तून जिल्ह्यातील एक लाख चार हजार ६७५ शेतकऱ्यांना ११७५ कोटी रुपयांची कर्जमाफी मिळणार असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने (पीडीसीसी) हा अंदाज वर्तविला आहे.संबंधित कर्जदार शेतकऱ्यांच्या अल्पमुदत कर्जाची माहिती सरकारी पोर्टलवर दिल्यानंतर राज्य सरकारकडून अपात्रतेचे निकष लावले जाणार आहेत. त्यानंतर पात्र सभासद यादी तयार होणार आहे. मात्र, प्राथमिक अंदाजानुसार पुणे जिल्ह्यातील एक लाखांहून अधिक शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार असल्याचे 'पीडीसीसी' बँकेचे अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

डॉ. दुर्गाडे म्हणाले,' राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पीककर्ज थकीत असणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना दोन लाखांपर्यंत कर्जमाफी देण्यासाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' जाहीर केली आहे. कर्ज घेऊन नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही प्रोत्साहन देण्याच्या हेतूने ५० हजार रुपये प्रोत्साहनपर लाभ दिला जाणार आहे. दोन लाख रुपयांपर्यंतचे थकीत पीककर्ज असलेले बँकेचे ८३ हजार ३७६ शेतकरी आहेत. त्यांना सुमारे ७४९ कोटी १४ लाख रुपयांची परतफेड मिळण्याचा अंदाज आहे. थकीत पीककर्ज दोन लाखांपेक्षा जास्त असल्यास अशा शेतकऱ्यांना दोन लाखांपेक्षा जास्त थकीत असलेल्या रकमेची परतफेड करणे आवश्यक आहे. संबंधित रकमेची परतफेड केल्यानंतर त्या शेतकऱ्याला दोन लाखांपर्यंतची रक्कम मिळेल. अशा प्रकारचे २१ हजार २९९ कर्जदार असून, त्यांना राज्य सरकारकडून सुमारे ४२५ कोटी ९८ लाख रुपये मिळण्याचा अंदाज आहे. मागील तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षांत पीक कर्जाची परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये लाभ मिळणार आहे. संबंधित शेतकऱ्यांची संख्या दोन लाख १० हजार ८९४ असून, त्यांना सुमारे ९२७ कोटी ७९ लाख रुपये दिले जाणार आहेत.'




### तीन लाख सभासदांना कर्ज वितरित

**» बँकेने २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये खरीप आणि रब्बी हंगामासाठी ३ लाख १५ हजार २४६ सभासदांना ३ लाख १५ हजार ४०७ कोटी रुपयांचे कर्ज वितरित केले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत बँकेच्या व्यवसायामध्ये ३९४१.८८ कोटी रुपयांची वाढ झाली आहे. बँकेला तरतूदपूर्व नफा ४६१.३४ कोटी आणि निव्वळ नफा ७८.७८ कोटी झाला असल्याचे डॉ. दुर्गाडे यांनी सांगितले.**